**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/117/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2025 / दिनांक : 24/03/2025

---

# नांदेड पोलीस दलाची सोशल मिडीयावर आपत्तीजनक पोस्ट करणाऱ्यांवर करडी नजर व कडक कारवाई..

नांदेड जिल्हयातील सर्व सुजाण नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपण कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवु नये, तसेच खोटया अफवा पसरवू नये, सोशल मिडीयावर दोन समाजात तेढ निर्माण होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी पोस्ट करू नये. नांदेड पोलीसांची सर्व बाबींवर करडी नजर आहे. सोशल मिडीया अकाऊंटवर दैनंदिन व सतत लक्ष ठेवण्यासाठी सोशल मिडीया मॉनिटरिंग सेलची स्थापना केली आहे.

त्या अनुषंगाने सोशल मिडीया मॉनिटरिंग दरम्यान सायबर पोलीस स्टेशनकडुन जानेवारी 2025 ते अद्यापपावेतो 125 इंस्टाग्राम अकाऊंटची पुर्ण माहिती काढून संबधित पोलीस स्टेशन यांना त्यावर कारवाई करणेसाठी पाठविण्यात आलेली आहे आणि त्यावर कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पाठविण्यात आलेल्या माहिती वरून आत्ता पर्यंत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 कलम 168 नुसार तीन कारवाई करण्यात आलेल्या आहेत. तसेच 21 लोकांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सोशल मिडीयावर दोन समाजात तेढ निर्माण होईल असा मजकूर तसेच आपत्तीजनक मजकुर प्रसारीत केल्याने पोलीस स्टेशन येथे खालील प्रमाणे एकुण 09 गुन्हे दाखल करून संबधीतांवर कडक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| 1 | नांदेड ग्रामीण | 221/2025, 222/2025, 223/2025 | 4/25 भारतीय हत्यार कायदा |
| 2 | इतवारा | 39/2025 | 122 लोकप्रतिनिधी अधिनियम |
| 3 | कंधार | 72/2025 | 353(2) भारतीय न्याय संहिता |
| 4 | तामसा | 53/2025, 54/2025 | 353(2) भारतीय न्याय संहिता |
| 5 | वजिराबाद | 125/2025 | 353(2) भारतीय न्याय संहिता |
| 6 | नांदेड ग्रामीण | 286/2025 | 353(1),(ब),353(1) भारतीय न्याय संहिता |

समाजामध्ये दहशत पसरविणारे व्हिडीओ तसेच आक्षेपार्ह पोस्ट डिलीट करण्यात आल्या आहेत आक्षेपार्ह पोस्ट अपलोड करणाऱ्या इसमांवरती योग्य ती प्रतिबंधात्मक/कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

नांदेड जिल्हा पोलीस दलाचे सर्व बाबींवर बारकाईने लक्ष असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीसांना सहकार्य करावे जिल्हयातील शांतता अबाधित ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. काही सामाजीक/धार्मिक बाब, आक्षपार्ह लिंक, पोस्ट, स्टेटस निदर्शणास आल्यास **सोशल मिडीया मॉनिटरिंग सेल क्रमांक 7774034100** यावर अथवा पोलीस स्टेशनला संपर्क साधावा. उपरोक्त गुन्हयात काही विधीसंघर्ष बालकांचा समावेश असल्याने पालकांनी त्यांचे मुलांचे सोशल मिडीयावर लक्ष ठेवून दोन समाजात तेढ निर्माण होणारे स्टेटस/वक्तव्य सोशल मिडीयावर प्रसारीत करणार नाहीत याची दक्षता घ्यावी. असे मा. श्री **अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी आवाहन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड